# संजीवनमध्ये यूपीएससी मधील करिअर संधींवर कार्यशाळा –




**पन्हाळा : प्रतिनिधी**

पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून यूपीएससी ची तयारी करणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून यूपीएससी परीक्षा विभाग दिल्ली चे संचालक डॉ. केशवराव खंडोजीराव जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले होते. प्रमुख पाहुण्यांचा परिचय, स्वागत व कार्यशाळेचा उद्देश कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी यांनी सांगितला.

प्रमुख पाहुणे डॉ. के. के. जाधव यांनी आपल्या मनोगतामध्ये, यूपीएससी मधील आए. ए. एस., आए. पी. एस., आए. ई. एस. व इतर सर्व परीक्षांची सविस्तर माहिती दिली. तसेच या परीक्षांचे स्वरूप, त्याला कश्या प्रकारे सामोरे गेले पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. या परीक्षांबाबत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंड दूर करून स्पर्धा परीक्षांना सामोरे जाणेसाठी प्रोत्साहित करणेत आले. भारताच्या संविधानातील राष्ट्रपती ते गावातील सरपंच यांचे कश्याप्रकारे काम चालते याबाबतची माहिती सांगितली.

कार्यक्रमानंतर महाविद्यालयाच्या परिसरात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करणेत आले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रसाद कुलकर्णी व प्रा. राहुल उरुणकर यांनी केले होते. कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले, कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी, परीक्षा विभाग डीन डॉ. एस. एल. घोडके यांच्यासह कॉलेजमधील सर्व विभागप्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सिद्धार्थ रेमाने याने केले तर आभार प्राचार्य डॉ. मोहन वनरोट्टी यांनी मानले.

**फोटो ओळ –**

**पन्हाळा :** येथील कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना डॉ. के. के. जाधव. व्यासपीठावर पी. आर. भोसले, एन. आर. भोसले, डॉ. मोहन वनरोट्टी व मान्यवर